# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः10.05.2024** **वारःशुक्रवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारात प्रत्यक्ष गाठीभेटी, बैठकांवर भर
2. महाराष्ट्रात 11 मतदारसंघात प्रचाराची रणधुमाळी, सर्व पक्षीय नेत्यांच्या सभांचा धुरळा
3. ब्रिटनचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार टीम बॅरो भारत दौऱ्यावर, द्वीपक्षीय संबंधांवर चर्चा आणि
4. देशभरात विविध राज्यांत पावसाचा अंदाज, राजस्थान, गुजरातमध्ये उष्ण हवामान कायम राहाणार

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीच्या प्रचारामुळे वातावरण तापलं आहे. सर्वच पक्षांचे उमेदवार आता मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटींवर भर देत आहेत; तर मातब्बर नेते जाहीर सभा, प्रचार फेऱ्या आणि बैठका घेऊन मतदारांना आवाहन करत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र, तेलंगण आणि ओदिसामध्ये प्रचार दौरा करणार आहेत. महाराष्ट्रात नंदुरबारमध्ये ते आज प्रचार सभा घेणार आहेत.

**महाराष्ट्र प्रचार**

महाराष्ट्रात चौथ्या टप्प्यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड लोकसभा मतदार संघात मतदान होणार आहे. निवडणूक प्रचाराचे दोनच दिवस शिल्लक असल्यानं राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. भाजपाचे नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अहमदनगर, शिर्डी आणि पुणे लोकसभा मतदार संघात प्रचार सभांचा धडाका लावला. ही निवडणूक देशाचा नेता निवडण्यासाठी आहे, असं फडणवीस पुण्यात बोलताना म्हणाले. यावेळी केंद्र सरकारच्या गेल्या दहा वर्षातील कामांची माहिती त्यांनी दिली तसंच विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. तर जसजसे निवडणुकीचे पुढचे टप्पे पार पडत आहेत, तसतसे मोदी अस्वस्थ होत आहेत अशी टिप्पणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. ते काल साताऱ्यात वार्ताहरांशी बोलत होते. कांदा निर्यातीसाठी केंद्र सरकारनं लावलेला 40 टक्के कर त्वरित मागे घ्यावा, त्यासाठी राज्य सरकारनं प्रयत्न करावेत, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली.

**राजनाथ सिंह**

ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माच्या क्षेत्रात संपूर्ण जगाचं नेतृत्व करू शकेल, असा समृद्ध भारत भाजपाला घडवायचा आहे असं मत ज्येष्ठ भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी काल व्यक्त केलं. राजनाथ सिंह हे लखनौ लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार आहेत. संरक्षण सामग्री तयार करण्यात देश स्वावलंबी होत असल्याचं राजनाथ सिंह यांनी यावेळी सांगितलं. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी काल बहराइचमध्ये एका जाहीर सभेत भाजप देशातल्या शेतकरी आणि तरुणांच्या विरोधात काम करत असल्याची टिका केली. त्यांनी धौराहरा आणि लखीमपूर खिरी मतदारसंघातही प्रचार केला. रायबरेली मतदारसंघात प्रचार करताना जिथे जिथे काँग्रेस पक्ष सत्तेवर आला आहे तिथं जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण केली आहेत, असं काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वड्रा यांनी काल सांगितलं. दुसरीकडे बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख  मायावती यांनीही कन्नौज जिल्ह्यात काल जाहीर सभेत भाजपवर जोरदार हल्ला चढवला.

**राष्ट्रपती-पद्मपुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल देशभरातील विविध 65 मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात महाराष्ट्र राज्यातल्या सहा मान्यवरांचा समावेश आहे. राष्ट्रपती भवनात झालेल्या या भव्य सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप

धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, तसंच वरिष्ठ केंद्रीय मंत्री उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात पार पडलेल्या या पद्म पुरस्कार सोहळ्यात दोन पद्मविभुषण, आठ पद्मभुषण आणि 55 पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**उपराष्ट्रपती-आयोध्या भेट**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज संध्याकाळी अयोध्येला भेट देणार असून ते राम लल्लाचं दर्शन घेऊन पूजा करतील. अयोध्येतल्या श्री रामजन्मभूमी मंदिरातील प्राण प्रतिष्ठा सोहळ्यानंतर उपराष्ट्रपतीची ही पहिलीच भेट आहे. आपल्या एकदिवसीय दौऱ्यात ते आज अयोध्येतील श्री राम लल्ला मंदिर, हनुमानगढ़ी मंदिर, कुबेर टिळा यांना भेट देतील आणि शरयू घाटावरील आरतीमध्येही सहभागी होतील.

**अक्षय्य तृतीया**

वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय्य तृतीयेचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा केला जात आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या दिवशी नवीन कामांचा प्रारंभ केला जातो, तसंच नवीन वस्तू, सोने-चांदी, वाहन आणि गृह खरेदीही केली जाते. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर सर्वच बाजारपेठांमध्ये उत्साहाचं वातावरण दिसून येत आहे. आजपासून चारधाम यात्रेलाही सुरुवात होत आहे. केदारनाथ मंदिरांचे दरवाजे आज विधिवत उघडण्यात आले. आजच्याच दिवशी परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती देखील आहे. यानिमित्त, अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**ब्रिटन-भारत**

भारत दौऱ्यावर आलेले ब्रिटनचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार टिम बॅरो यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेऊन द्विपक्षीय संबंध वाढविण्याबाबत चर्चा केली. दोन्ही देशामधील धोरणात्मक सहकार्याविषयीदेखील यावेळी चर्चा झाली. या भेटीदरम्यान सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यावर तसंच जागतिक सुरक्षा आव्हानांविषयी चर्चा झाल्याचं भारतातील ब्रिटीश उच्चायुक्तांनी समाज माध्यमावर सांगितलं.

**आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रमांतर्गत 23 देशांतील 75 प्रतिनिधींनी भारतातल्या सहा राज्यांमधील लोकसभा निवडणुक मतदान प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. निवडणुकीच्या पारदर्शकतेचं, ईव्हीएम व्हीव्हीपॅट तंत्रज्ञान वापराचं आणि पर्यावरण पूरक मतदान केंद्रासारख्या उपक्रमांची या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी प्रशंसा केली. भारतातील निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, सर्वसमावेशक आणि उत्सवी वातावरणात होत असल्याचं निरीक्षण या प्रतिनिधींनी नोंदवलं.

**लोकसंख्या घट**

दक्षिण आशियाई देशांपैकी भारतात बहुसंख्याकांच्या संख्येत 1950 ते 2015 या कालावधीत म्यामाखालोखाल 7 पूर्णांक 82 शतांश टक्के एवढी लक्षणीय घट झाली आहे, असं पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या कार्यपत्रिकेत म्हटलं आहे. मात्र याच कालावधीत मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध आणि शीख या अल्पसंख्याक समुदायांच्या लोकसंख्येत वाढ तर पारशी आणि जैन समाजाच्या संख्येत घट झाल्याचं आढळलं आहे. देशातील हिंदू लोकसंख्येचं प्रमाण 1950 मध्ये 84 पूर्णांक 68 शतांश टक्के होतं, 2015 पर्यंत ते 78 पूर्णांक 6 शतांश टक्क्यांवर आलं असल्याचं पंतप्रधानांच्या सल्लागार मंडळानं म्हटलं आहे. मुस्लिम समाजाची संख्या 43 पूर्णांक 15 शतांश टक्कयांनी तर ख्रिश्चन लोकसंख्या 5 पूर्णांक 38 शतांश टक्क्यांनी वाढली आहे.

**एअर इंडिया**

विमानं रद्द झाल्याच्या संदर्भात एअर इंडिया एक्सप्रेसनं कामावरून कमी केलेल्या 25 वरिष्ठ विमान कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेतलं आहे. विमान कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले जातील, असं कंपनीनं आश्वासन दिल्यानंतर या कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घेतला. कोणतीही पूर्वसूचना न देता अनेक विमान कर्मचारी अचानकपणे सामूहिक आजारपणाच्या रजेवर गेल्यानंतर एअर इंडिया एक्सप्रेसची अनेक उड्डाणं रद्द झाली किंवा नंतर विमानाच्या वेळा बदलल्यानं ज्या प्रवाशांना त्रास झाला त्यांना आपल्या तिकिटाची पूर्ण रक्कम परत घेता येणार आहे.

**महिला क्रिकेट**

बांगला देशविरुद्धची वीस षटकांची क्रिकेट मालिका भारतीय महिला संघानं 5-0 अशी जिंकली आहे. बांगलादेशात सिल्हट इथं काल झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं 31 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकात, 5 गडी गमावून 156 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल बांगलादेशाला 20 षटकात 6 गडी गमावून 135 धावाच करता आल्या. भारताच्या राधा यादवनं 3, तर आशा शोभनानं 2 बळी घेतले.

**हॉकी इंडिया**

बेल्जियम आणि लंडनमध्ये होणाऱ्या FIH हॉकी प्रो लीग 2023-24 साठी हॉकी इंडिया नं काल 24 सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघ जाहीर केला. बेल्जियम लीग 22 ते 30 मे तर इंग्लंड लीग 1 जून ते 12 जून पर्यंत असेल. हरमनप्रीत सिंग भारतीय संघाचं नेतृत्व करणार असून हार्दिक सिंगला उपकर्णधारपद देण्यात आलं आहे. तर गोलकीपिंगची जबाबदारी पीआर श्रीजेश आणि कृष्ण बहादूर पाठक याच्याकडे असेल.

**डेथ टोल**

तामिळनाडूतील शिवकाशी इथं काल फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात मरण पावलेल्यांची संख्या आता 10 झाली आहे. या दुर्घटनेत 11 जण गंभीर जखमी झाले असून बेपत्ता व्यक्तींचा दुर्घटना स्थळी ढिगाऱ्यांखाली शोध घेण्यात येत आहे. मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी दुर्घटनेतील जीवित हानीबद्दल शोक व्यक्त केला आहे, बचाव कार्य वेगानं राबवावं तसंच दुर्घटनेतील जखमींना योग्य उपचार सुविधा मिळेल याची खबरदारी घ्यावी अशा सूचनाही स्टालिन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत

**हवामान**

राजस्थातील उष्णतेची लाट आजही कायम राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. गुजरातमध्ये रविवारपर्यंत हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा अंदाज आहे. पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, ओडिशा आणि झारखंड आज वादळी वारे आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता असून पुढील दोन दिवस अशीच स्थिती राहील, तसंच महाराष्ट्रामध्ये विदर्भात तसंच छत्तीसगड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान, चंडीगड आणि हरयाणातही पुढील दोन दिवस विजांसह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.